**सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि,. सोलापूर**
**मुख्य शाखा :- २०५ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर**

12

# स्वच्छ चलन धोरण (Clean Note Policy) 2023-24 & 2024 -25

1. **प्रस्तावनाः** आपल्या देशामध्ये चलनी नोटांच्या बाबतीत सर्वसाधारण जनतेमध्ये जागरूकता नसल्याने नोटावर लिहिणे, नोंदी करणे, नोटांच्या घड्या घालणे, गुंडाळी करणे, कुंकू, रंग लावणे, नोटा तेलकट होणे, या सारख्या कारणाने चलनी नोटा घाण आणि अस्वच्छ होतात आणि त्यांचे आयुष्य कमी होऊन नोटा चलनातून लवकर बाद होतात. त्यास आळा घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेने स्वच्छ चलन धोरण (Clean Note Policy) लागू करण्याचे निर्देश बँकांना दिले आहेत. त्यास अनुसरून,आपल्या बँकेची सदरचे पॉलिसी अंमलात येत आहे.
2. **धोरणाचा हेतू** : सदर धोरणाचा प्रमुख सेतू हा बँकेच्या ग्राहकांना स्वच्छ चलन (नोटा) उपलब्ध करून देणे आणि घाण व अस्वच्छ नोटा चलनातून बाहेर करणे असा आहे.
3. **मार्गदर्शक सूचना:** स्वच्छ चलन उपलब्ध होण्यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचनांचा अवलंब बँकेच्या सर्व शाखांतून करण्यात येईल.

- प्रत्येक मूल्यांच्या १०० नोटा झाल्या नंतर त्याचे बंडल स्टेपल केले जाणार नाही.
- स्टेपल करण्याऐवजी बंडल करताना रबरी किंवा पॉलिथीन बँड वापरण्यात येईल.
- शाखातून नोटांची विभागणी करताना पुन्हा चलनात आणण्यास योग्य आणि चलनास अयोग्य अश्या दोन प्रकारात विभागणी (sorting) करण्यात येईल.
- ग्राहकांना काउंटर वर केवळ स्वच्छ आणि स्टेपल न केलेल्या नोटा उपलब्ध करून दिल्या जातील. ग्राहकांनी काऊंटर सोडण्यापूर्वी मिळालेल्या नोटा मोजून बरोबर असल्याची खात्री करून घेऊनच कॅश काऊंटर सोडावा. अशा प्रकारच्या सूचना शाखेत नोटीस बोर्डावर लावण्यात येतील.
- ग्राहकांकडून नोटा स्वीकारताना केवळ स्टेपल न केलेल्या नोटाच स्वीकारल्या जातील. तशा स्वरुपाची सूचना शाखेत लावली जाईल. तसेच ग्राहकांकडून नाणी आणि लहान मूल्यांच्या नोटा देखील स्वीकारल्या जातील.
- फक्त अतिवापरामुळे जीर्ण आणि मळक्या झालेल्या नोटा ग्राहकास बदलून दिल्या जातील. मात्र तुकडे झालेल्या, फाटलेल्या नोटा स्वीकारताना चलनी नोटा योग्य रीतीने पाठीमागून बाजूस खाकी कागदाची छोटी पट्टी चिकटविलेली असली पाहिजे. तसेच नोटांचे तुकडे हे त्याच अनुक्रमांकाचे आणि त्याच मूल्याच्या नोटांचे असले पाहिजेत. मात्र ज्या नोटांवर कांही मजकूर लिहिला असेल अथवा नोटांना रंग लागलेला असेल तर अशा नोटा बँक स्वीकारणार नाही.
- या संदर्भात जन जागृती करण्याचे प्रयत्न बँकेच्या वतीने करण्यात येतील.
- बँकांकडे असलेल्या जीर्ण मळक्या नोटा रिझर्व्ह बँकेकडून बदलून घेतल्या जातील.

सदरचे धोरण त्वरित प्रभावाने बँकेच्या सर्व शाखांतून लागू राहील.

दि. २९ जुलै २०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेत सदरच्या स्वच्छ चलन धोरणास (Clean Note Policy) 202४ -2 ५) सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

(जनरल मॅनेजर)